(13)

उपपदार्थ शाखा

[3]

जा.क्र.साआ/उपप/कक्ष-१३/सहवीज/परिपत्रक/२००४
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
दिनांक :- ६ सप्टेंबर, २००४

# परिपत्रक

विषय :- सहकारी साखर कारखान्यामार्फत
सहविज निर्मितीप्रकल्प उभारणी.

महाराष्ट्र राज्यात सहकारी साखर कारखान्यात उस गाळपातून निर्माण होणा-या बगॅस पासून सहविज निर्मिती प्रकल्प उभे करण्यास मोठी संधी आहे. सहवीज निर्मिती प्रकल्पाद्वारे कारखान्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. राज्यात एकुण गाळपाचा विचार करता १००० ते १२०० मे.वॅट विज निर्मितीची क्षमता सहकारी साखर कारखान्यांकडे आहे. प्रत्यक्षात मात्र ३५ मे. वॅट विज निर्मिती सहकारी साखर कारखान्यांने करत आहेत. सहवीज प्रकल्प उभे करण्यासाठी गेली १० वर्षे अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत. मात्र त्यामध्ये अदयाप यश येऊ शकले नाही. यातुन मार्ग काढण्यासाठी साखर आयुक्तालयात दि. ३.९.२००४ रोजी इच्छुक कारखान्यांची सभा बोलाविली होती. या सभेत श्री. अशोक हरणे, कार्यकारी संचालक I.L.&F.S. व डॉ. बावडेकर, व्यवस्थापकीय संचालक, MITCON या दोन सल्लागारांनी सहवीज निर्मिती प्रकल्पासंदर्भात सादरीकरण केले यातून साखर आयुक्तालयाने कारखान्यांनी सहवीज निर्मिती प्रकल्प स्वबळावर अथवा BOOT पध्दतीने लवकरात लवकर करणे अत्यंत गरजेचे आहे असे अनुमान काढले असून कारखान्यांना खालील प्रमाणे त्याचे फायदे मिळू शकतात.

१) कारखान्याने सहवीज निर्मिती प्रकल्प घेतल्यास प्रती मे.टन ऊस गाळपातून ७० ते ९० रुपये जास्तीचे उत्पन्न कारखान्यास मिळू शकते.
२)कारखान्याच्या बॉयलर व टर्बाईनचा देखभालीचा व चालविण्याचा खर्च सर्वसाधारणपणे रु.५० लाख वाचणार आहे.
३) ग्रामीण भागातील विज दाबामध्ये सुधारणा त्यामुळे वीज पंप जळण्याचे प्रमाण कमी होईल.
४) विजेच्या भार नियमनामध्ये काही अंशी कपात.
५) कारखान्याला सिडीएम (CDM) चा फायदा - सीडीएम म्हणजे क्लीन डेव्हलपमेन्ट मेकॅनिझम याचा फायदा कारखान्याला मिळू शकतो . यामध्ये १ युनिट पॉवर तयार करण्यामध्ये ०.८ Kg कार्बनडाय ऑक्साईड निर्माण होतो. तेवढीच विज बॉयोमास / बगॅस वर तयार केल्यास वातारवणातील प्रदुषण कमी होते. जागतीक बाजारामध्ये याचा दर १ टन कार्बन डाय ऑक्साईड वायु कमी करण्यासाठी ३ ते ४ अमेरिकन डॉलर इतका आहे.

कारखान्याकडे ऊस उपलब्ध असल्यास व कारखान्याची आर्थिक परिस्थिती सक्षम असल्यास कारखान्याने प्रकल्प निश्चितपणे स्वबळावर हाती घ्यावा. यासाठी रा.स.वि.नि. / शुगर डेव्हलपमेंट फंड (SDF) यांचे मार्फत कमी व्याज दरात कर्ज उभारणी होऊ शकते मात्र परंतु इक्वीटी रुपाने बरीच मोठी रक्कम उभारावी लागणार आहे.

सहविज निर्मीती प्रकल्प घेण्यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई करु नये कारण आतापर्यंत या बाबतीत खुपच वेळ गेला आहे. व यानंतर विज नियामक मंडळाने देऊ केलेले विज दर व नियम हेच राहतील या बाबत खात्री देण्यांत येत नाही. विज नियामक मंडळाचे प्रोत्साहन नियम ३१/०३/२००७ पर्यंत लागू असणार आहेत. सध्याचा विजेचा दर रुपये ३.०५ प्रति युनिट व प्रतिवर्षी २ % वाढ मिळणार आहे. सध्याचा विजेचा दर हा आकर्षक असून कारखान्याच्या फायदेशीर आहे.त्यामुळे यापुढे वेळ घालविल्यास कारखान्याचे पर्यायाने शेतक-याचे नुसान होणार आहे.

**प्रकल्प खर्च** : प्रकल्प खर्च प्रामुख्याने प्रकल्प कोणत्या पध्दतीने करणार यावर अवलंबून आहे.सर्व साधारणपणे बॅक प्रेशर पध्दतीने प्र.मे.विज निर्मिती खर्च कमी येतो व कंडेन्सिंग रुट पध्दतीने खर्च जास्त येतो मात्र बॅक प्रेशर पध्दतीने झालेली विज निर्मिती इन्सिडेंटल विज निर्मिती प्रकारात मोडण्याची शक्यता आहे व त्यामुळे MERC चा दर रु.३.०५ प्रति युनिट मिळणे अडचणीचे होऊ शकते. दुसरी महत्वाची बाब म्हणजे कंडेन्सिन पध्दतीने वीज निर्मिती केल्यास ऑफ सिझन मध्ये देखील प्रकल्प सुरु राहू शकतो.वरिल दोन्ही फायद्यांचा विचार करुन सह विज-निर्मिती प्रकल्पांची उभारणी करताना इतर राज्यात प्रामुख्याने कंडेन्सिग रुट पध्दती वापरण्यात आलेली आहे.

सध्या ब-याचे कारखान्यांकडे ४५ के.जी./से.मी.चे बॉयलर आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी जादाची पॉवर निर्माण करणे शक्य आहे. या मधील बरेच कारखाने प्रेशर रेडयुसिंग डी सुपरहिटींग स्टेशन (PRDS) मधून १० टनापासून ते ४० टनापर्यंतची वाफ पाठवितात. त्या ठिकाणी पॉवर लॉस होतो . या वाफेचा विज निर्मितीसाठी वापर करुन अतिरिक्त विज निर्माण करणे सहज शक्य आहे. अशा ससाकानी प्रामुख्याने सह विज निर्मिती प्रकल्प दिरंगाई न करता लवकरात लवकर हाती घेणे गरजेचे आहे.

सध्या कंडेन्सिन पध्दत कारखान्यात घ्यावी अथवा बॅक प्रेशर याबाबत तज्ञांमध्ये संभ्रमता आहे. याला पर्याय म्हणून मधला मार्ग हायब्रिड रुट (संकरीत पध्दत) म्हणजे सध्या अस्तित्वात असणारे ४५ के.जी.चे बॉयलर व टी.जी.सेट तसेच ठेवून त्या बरोबर नविन एक बॅक प्रेशर कम कन्डेंसिंग प्रकारचा टी.जी.सेट व उच्च दाबाचा एक बॉयलर बसवून हंगामामध्ये जुन्या बॉयलर व टर्बाइन मधून कारखान्याला वाफ व विज पूरवून अतिरिक्त वीज म.रा.वी. मंडळाला हंगामात व बिगर हंगामात देता येईल अशा पध्दतीचा प्रकल्प पाडुंरग ससाकाने नुकताच हाती घेतला आहे.

पाडुंरग सहकारी साखर कारखान्याने सह विज निर्मिती प्रकल्प ९ मं.वॅ.क्षमतेचा असून त्याचा खर्च प्रति मे.वॅट ३ ते ३.५ कोटी इतका अपेक्षित आहे. हा खर्च कारखानानिहाय कमी जास्त होऊ शकतो.

मिटकॉन व आयएल अॅण्ड एफएस च्या दिनांक ३/९/२००४ च्या सादरीकरणानुसार २५०० मे.ट.प्रतिदिनी गाळप क्षमता असणा-या कारखान्यामध्ये १५ ते १६ मे.वॅट विज निर्माण

होऊ शकते.प्रकल्पाच्या किंमतीचा अंदाज रु. ४७.०० कोटी ते रुपये ५७.०० कोटी धरण्यात आला आहे. वरील तिनही प्रस्तावाचा विचार करता प्रति मे.वॅट खर्च रुपये ३.१८ ते ३.८० कोटी या दरम्यान येतो. म्हणजेच २५०० मे.ट.प्रतिदिनी गाळप क्षमता असलेल्या कारखान्यामध्ये १५ मे.वॅट विज निर्मिती करता येईल त्यासाठी रु.४५ ते ५० कोटी खर्च अपेक्षित आहे

स्वबळावर प्रकल्प उभारणी: वरील प्रमाणे प्रकल्प खर्च धरल्यास स्वभाग (Equity) २० % प्रमाणे धरून रु.८ ते १० कोटी पर्यंत येऊ शकते.यासाठी रा.स.वि.निगम व साखर विकासनिधी किंवा इतर कोणत्याही वित्तीय संस्थेकडून रुपये ३५.०० ते ४०.०० कोटी रुपये कर्ज घ्यावे लागणार आहे . यासाठी कारखान्याची आर्थिक स्थिती सक्षम असणे गरजेचे आहे. अशा प्रकल्पाना कारखान्याने घेतलेल्या कर्जास शासनाची थकहमी मिळणार नाही.

वरील बाबोंचा विचार करता रुपये ८ ते १० कोटी स्वभाग व रुपये ३५ ते ४० कोटी कर्ज घेण्याची क्षमता असल्यास त्याचप्रमाणे ४.०० लाख मे.ट. वार्षिक गाळप होईल इतका ऊंस उपलब्ध असणाऱ्या कारखान्यांनी स्वबळावर प्रकल्प उभारल्यास कारखान्याच्या फायद्याचा होऊ शकतो मात्र बिगर हंगामामध्ये सदर प्रकल्प राबविणयासाठी पर्यायी इंधनाची व्यवस्था करणे आवश्यक आहे

बूट पध्दतीने प्रकल्प उभारणी :-ज्या कारखान्याकडे ऊंसाची उपलब्धता आहे परंतु वरील प्रमाणे आर्थिक क्षमता नाही अशा कारखान्याने BOOT तत्वावर प्रकल्प उभारण्यास हरकत नाही. BOOT पध्दतीमुळे कारखान्यास १० % ते २६ % पर्यत स्वभागभांडवलामध्ये (Equity).गुंतवणूक करता येईल. ही रक्कम साधारणपणे १.२५ ते १.५० कोटी पर्यंत येऊ शकते. या प्रमाणे गुंतवणुक केल्यास कारखान्याला व्यवस्थापनात स्वभाग भांडवलाच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व व आर्थिक लाभ मिळू शकेल. यामध्ये भाग भांडवलाचे प्रमाणात जोखीम रहाणार आहे.

ज्या कारखान्याला स्वभाग भांडवल (Equity) गुंतवणूक करण्याची क्षमता नसल्यास गुंतवणूक न करता देखील प्रकल्प हाती घेता येईल. मात्र कारखान्याला वर उल्लेख केल्याप्रमाणे व्यवस्थापनात स्थान मिळणार नाही. व गुंतवणूकीवरील आर्थिक लाभाचा फायदा होणार नाही.

BOOT पध्दतीवर प्रकल्प १५ वर्षासाठी प्रवर्तकास कराराने देता येतील . १५ वर्षानंतर सदर प्रकल्प नाममात्र रक्कम घेऊन प्रवर्तकाकडून कारखान्याकडे हस्तांतरीत करण्यांत येईल .प्रकल्पाचे एकूण आयुष्य २५ वर्षाचे गृहीत धरल्यास १० वर्ष सदर प्रकल्प कारखाना राबवू शकतो. म्हणून पहिले १५ वर्षात बिडींग प्रमाणे रु.७० ते ९० प्र.मे. टन (अंदाजीत) कारखान्याला मिळू शकतील दुस-या वर्षापासून कारखान्याला मिळणा-या रकमेत १५ वर्षापर्यंत ठरविक वाढ मिळेल व त्यापुढे पूर्ण नफा कारखान्याला मिळेल.

या पध्दतीनुसार कारखान्याचे गाळप १० % पर्यंत कमी जास्त झाल्यास कारखान्यास पूर्ण फायदे मिळतील , मात्र १०% पेक्षा कमी जास्त गाळप झाल्यास कारखान्यास त्याप्रमाणात फायदे तोटे सहन करावे लागतील.

BOOT पध्दतीने प्रकल्प घेण्यासाठी सर्व इच्छुक ससाकाच्या वतीने एकित्रित निविदा मागवून कारखान्यास मिळावयाच्या प्रति टन गाळपास मिळणा-या आर्थिक लाभावर बिडींग

येईल. यामध्ये कोणत्याही प्रकारे वाटाघाटीस वाव दिला जाणार नाही. त्यामुळे व्यवहारामध्ये पूर्ण पारदर्शकता ठेवता येईल.

BOOT पध्दतीने प्रवर्तकाची निवड करताना (Pre qualification) ठेवले जाणार असल्यामुळे सक्षम प्रवर्तकांचीच निवड केली जाईल. कराराप्रमाणे जर प्रवर्तकाने प्रकल्प कार्यान्वित केला नाही तर दंडात्मक कारवाईची तरतूद करारात करण्यांत येईल. हीच अट कारखान्यालाही लागू राहील.

कारखान्याकडे असलेल्या उपलब्ध मशिनरी नुसार उदा.बॉयलर प्रेशर व कॅपीसीटी, टर्बाइन प्रकार व कॅपीसीटी, स्टिम व विज वापर, गाळप क्षमता यावर प्रकल्पाचा खर्च अवलंबून राहील. त्यामुळे कारखाना निहाय प्रकल्प अहवाल तयार करावे लागतील. :

कारखान्याना MERC ने दिलेल्या विज खरेदी बाबतच्या आदेशाचा फायदा घ्यावयाच्या दृष्टिने नोव्हेंबर २००४ पर्यंत प्रकल्प कोणत्या पध्दतीने (स्वबळावर / BOOT) घ्यायवचा याबाबत अंतीम निर्णय घेवून प्रकल्प अहवाल मार्च २००४ पर्यंत विहित करार होवून प्रकल्प उभारणीस सुरुवात होणे गरजेचे आहे तसे झाल्यास ऑक्टोंबर २००६ पर्यंत प्रकल्प कार्यान्वीत होवून वीज नियामक मंडळाने दिलेल्या विज दराचा फायदा कारखान्यांना मिळू शकेल.

आपल्या कारखान्यासाठी सहवीज निर्मिती प्रकल्प घेवू इच्छित असल्यास सदर प्रकल्प स्वत: घेणार किंवा BOOT पध्दतीने घेणार या बाबतचा संचालक मंडळाचा ठराव सप्टेंबर २००४ अखेर साखर आयुक्तालयाकडे पाठविणे आवश्यक आहे.सदर प्रस्ताव आम सभेपुढे मंजूरीसाठी ठेवावा.

6/9

साखर आयुक्त
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रति,
कार्यकारी संचालक
________________ सहकारी साखर कारखाना लि.
ता. ________ जि. ________________

मिळणा-या उत्पन्नाचा फायदा होत नाही . तो मिळण्याच्या दृष्टीने यापुढे असे सामंजस्य करार करताना या कार्यालयातील तज्ञांचा सल्ला घेऊनच कार्यवाही करावी म्हणजे पुढील होणारे कारखान्याचे नुकसान टाळणे शक्य होईल

उपरोक्त विषयाबाबत आपणास आदेशित करण्यांत येत आहे की, साखर आयुक्तालयाच्या शिफारशीशिवाय कारखाना पातळीवर परस्पर सहविज निर्मितीसाठी खाजगी कंपन्यांबरोबर सामंजस्य करार (M.O.U.) करण्यांत येवू नयेत.

27/10

साखर आयुक्त
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत :-

१) कार्यकारी संचालक,
_____________ सहकारी साखर कारखाना मर्या. _______
ता. _______________ जि. _______________

२) प्रादेशिक सहसंचालक (साखर) सर्व